वर्ष ११ वे

अंक ३ रा

## सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

# वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

**-: कार्यक्रमाचे स्थळ :-**

**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह,**

मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे-३३

**रविवार दि. २४.७.२०११ रोजी दुपारी २ वाजता**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**ऑगस्ट-सप्टें-ऑक्टो. -नोव्हें.२०११**

फक्त सभासदांकरिता

(खाजगी वितरणासाठी)

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१ कोटी २० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

**जी दानशूर व्यक्ती मंडळाच्या शैक्षणिक फंडास रुपये एक लक्ष किंवा अधिक देणगी देईल त्या व्यक्तीने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यास वसतिगृहाच्या मासिक शुल्कामध्ये दरमहा रु.५००/- शिष्यवृत्तीच्या स्वरुपात सवलत देण्यात येईल.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ९ जुलै, २०११ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २४.०७.२०११** रोजी **०२.३० वा. पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२९.०८.२०१० रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१०-२०११ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०११ ते २०१२ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०११ ते २०१२ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.२१.०७.२०११** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✽ आपले नम्र ✽**

| | | |
|---|---|---|
| **हौसाराम विठ्ठलराव घोडके**<br>अध्यक्ष | **सखाराम कोंडिबा गागरे**<br>उपाध्यक्ष | **बाजीराव झुंजारराव जगदाळे**<br>सेक्रेटरी |
| **सुनील कुंडलीक पोटे**<br>सहसेक्रेटरी | **डॉ.बाळासाहेब बांडे**<br>कार्यवाहक | **मधुकर हौशाभाऊ शिरोळे**<br>सहकार्यवाहक |

**सदस्य :- इंजि.विजयकुमार गोविंदराव ठुबे, अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, तारकराम सिताराम झावरे, बाळासाहेब हरिभाऊ येणारे, प्रा.गोरक्ष रामकृष्ण जगताप.**

## ✽ कार्यक्रमाचे स्थळ ✽

**रविवार दि.२४.०७.२०११ रोजी दुपारी २.३० वा.**
**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, मंगल नगर, वाकड रोड,**
**डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११ ०३३. संपर्क - अशोक वाबळे ९८८१६०८३५७**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

## स्नेह मेळावा,
## विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव
## कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.२४ जुलै २०११** रोजी **दुपारी २** वाजता **पारनेर तालुका मित्र मंडळ विद्यार्थी वसतिगृह, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**❊ अध्यक्ष ❊**

**मा.शिवाजीराव झावरे (सी.ए.)**

सदस्य, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकौंटंटस् ऑफ इंडिया,
संचालक, झावरे प्रोफेशनल अकॅडमी, पुणे.

**❊ प्रमुख पाहुणे ❊**

**मा.बाळासाहेब शिंदे**

सिनीयर क्वालीटी ॲश्युरन्स ऑफीसर
(पूर्व विभाग प्रमुख) संरक्षण खाते, भारत सरकार.

**मा.बन्सी भागुजी गवळी**

उपजिल्हाधिकारी, अलिबाग

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम विठ्ठलराव घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार गोविंदराव ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**बाजीराव झुंजारराव जगदाळे**
सेक्रेटरी व अध्यक्ष, निधी समिती

**सखाराम कोंडिबा गागरे**
उपाध्यक्ष

**सुनील कुंडलीक पोटे**
सहसेक्रेटरी

**मधुकर हौशाभाऊ शिरोळे**
सहकार्यवाहक

**डॉ.बाळासाहेब बांडे**
(कार्यवाहक)

**सदस्य :- अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, तारकराम सिताराम झावरे, बाळासाहेब हरिभाऊ येणारे, प्रा.गोरक्ष रामकृष्ण जगताप.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

रविवार दि.२४ जुलै २०११ रोजी आपल्या मंडळाच्या मालकी हक्काच्या जागेमध्येच आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याचे सिंहावलोकन करण्याच्या निमित्ताने स्नेहमेळावा, यशस्वी विद्यार्थी व गुणवंत व्यक्तींचा गौरव समारंभ आयोजित केला आहे. या कार्यक्रमानंतर लगेचच मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभाही आयोजित केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप तसेच सूचना व मार्गदर्शन करण्यासाठी आपण या कार्यक्रमास कोणतेही कारण न सांगता उपस्थित रहावे ही विनंती.

आपल्या मंडळामार्फत सुरु केलेल्या विद्यार्थी वसतिगृहाचे कामकाज आता चांगल्या प्रकारे सुरु झाले आहे असे आपणास सांगताना मला आनंद होत आहे. शिवश्री हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली पारनेर तालुका मित्र मंडळाची घोडदौड अतिशय यशस्वीरित्या चालली आहे.

मागील वर्षी विद्यार्थी वसतिगृहाबरोबरच मुलींचे वसतिगृह बांधण्याबाबत सभासद व हितचिंतकांकडून अतिशय मोठ्या प्रमाणात आग्रह झाला होता. त्यासाठी जागा मिळण्याबाबत दानशूर व्यक्तींनी सहकार्य करावे म्हणन आपणा सर्वांना आवाहनही केले होते. परंतु अद्याप त्याबाबत काहीच प्रगती झालेली नसून आम्ही आशावादी आहोत. आपल्यामधूनच कोणीतरी यासाठी योगदान द्यावे अशी अपेक्षा आहे. ती यावेळी पूर्ण व्हावी अशी राष्ट्रमाता जिजाऊ चरणी प्रार्थना.

आपल्या तालुक्यातील व्यक्तींकडे मोठी गुणवत्ता असल्याचे मी मागील एका अंकामध्ये नमूद केले होते. त्याचे उत्तम उदाहरण कान्हूर पठार येथील **श्री.प्रकाश कृष्णराव ठुबे यांचे देता येईल. श्री.ठुबे सध्या अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांना नुकतेच आय.ए.एस. कॅडर मिळाले आहे व त्यांची बुलढाणा येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून शासनाने नेमणूक केली आहे. तसेच श्री.दत्तात्रय तुकाराम ठुबे हे सार्वजनिक बांधकाम खात्यातून दिल्ली येथे प्रधानमंत्री सडक योजनेमध्ये भारतात एकमेव असलेल्या तांत्रिक संचालक या सर्वोच्च पदावर पोहोचले आहेत. याशिवाय पिंपरी पठारचे श्री.बाळासाहेब शिंदे यांची भारत सरकारच्या संरक्षण विभागातील संपूर्ण पूर्व विभागाचे सिनीयर क्वालिटी इन्शुरन्स ऑफिसर म्हणून बढती झाली आहे.** अशा प्रकारे यश मिळविलेल्या सर्व गुणवंतांचे हार्दिक अभिनंदन. या गुणवंत व्यक्तींकडून पारनेरकरांसाठी भरीव योगदान मिळण्याची अपेक्षा करतो.

या अंकातील 'नांदा सौख्य भरे, भावपूर्ण निरोप, निधन वार्ता, आपण असे केले तर व अभिनंदन' या सदरासाठी आपणाकडून चांगला प्रतिसाद मिळत असला तरी 'कर्तृत्व पारनेरकरांचे' या सदरासाठी आपल्या यशस्वी बांधवांचे लेख येत नाहीत ही खंत आहे. यापुढे ही खंत राहणार नाही व आपणाकडून प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा ठेऊन गौरव समारंभास येण्याचे आपणास आव्हान करतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.सखाराम गागरे | उपाध्यक्ष | ९७३००७५०३३ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सेक्रेटरी | ९०११०२१४३० | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.सुनील पोटे | सहसेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | कार्यवाहक | ९८२२०५१५९३ | श्री.अशोक वाबळे | सदस्य | ९८८१६०८३५७ |
| श्री.मधुकर शिरोळे | सहकार्यवाहक | ९९२२१६६१२५ | श्री.तारकराम झावरे | सदस्य | ९४२३७८८९१७ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ | श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ | श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सदस्य | ९८६०९०७६१८ |

## वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**१) श्री.अशोक विश्वनाथ वाबळे - मो.९८८१६०८३५७ २) श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे - मो.९९२२१६६१२५**


# विद्यार्थी गौरव - दहावी



कुमारी श्रद्धा विजय
काकडे, रा.कान्हूर पठार
९७.०९%



कुमारी प्रणाली दत्तात्रय
ठुबे, रा. कान्हुर पठार
९६.५५%



कु.चैत्राली बाबाजी जाधव
रा.म्हसे
९५%



कुमारी कोमल सुहास
औटी, रा.पारनेर
९४.५%



कु.रुपेश शिवाजी ठुबे
रा.पारनेर
९४%



कु.विजय कांतीलाल
कर्नावट, रा.खडकवाडी
९०.५%



कुमारी स्नेहल श्रीकांत
चव्हाण, रा.पुणे
९०.५%



कु.तुषार बाबाजी तोडकर
रा. वडझिरे
९०%



कु.मितेश वसंत गाडेकर
रा. वडझिरे
८९%



कु.मयुर एकनाथ तांबे
रा.गोरेगाव
८६%



कुमारी शिवांजली शिवाजी
थोरात, रा.पाडळी आळे
८५%



कु.शुभम रविंद्र कटारिया
रा. तिखोल
८४%



कु.अमेय तुळशीराम घुले
रा. दशमीगव्हाण
८४%



कुमारी प्रियंका अशोक
खोसे, रा.पाडळी दर्या
८२%



कु. मयुर अशोक वाबळे
रा. निघोज
८१%




कु.दिगंबर धोंडीभाऊ ढेंबरे
रा.संगमनेर
८१%



कुमारी पल्लवी रावसाहेब
लंके, रा.निघोज
८१%



कुमारी योगिता सुभाष
कटारिया, रा.राळेगण
थेरपाळ - ८०%




कु.प्रतिक भगवान पठारे
रा.राळेगण सिद्धी
८०%

कु.शुभम राजेंद्र खोडदे
रा.किन्ही
८०%



कु.विशाल बाळासाहेब
बांदल, रा.गवळी पिंपरी
८०%



कुमारी तेजश्री सुधाकर
कावरे, रा.सिद्धेश्वरवाडी
७९%

# विद्यार्थी गौरव

## दहावी



कु.रणजित मधुकर दळवी,
रा.हंगे
७७%



कुमारी ज्योती शिवाजी
राऊत, रा.राऊतवाडी
७६%



कु.सुशांत निलकंठ मापारी
रा. राळेगण सिद्धी
७६%



कुमारी प्राजक्ता सुभाष
भालेकर, रा.रायतळे
७६%

कुमारी रचना रंगनाथ
भोंडवे, रा.ढवळपुरी
७५%



कुमारी शामल संतोष
कर्नावट, रा.खडकवाडी
७६%



कुमारी प्रणिता हरी खोसे,
रा.पाडळी दर्या
७२.५%



कु. निर्मलकुमार मुरलीधर
दुस्मान, रा. पुणेवाडी
७२%

कु.तुषार रामदास लोखंडे
रा. निघोज
६७%

## इ.१२वी सायन्स



कु.किरण निलकंठ मापारी
रा. राळेगण सिद्धी
८७% सिईटी १७३

कु.आदित्य भास्कर वराळ
रा.निघोज
८५%

## बारावी



कु.ऋतुजा बाळासाहेब
बांडे, रा.पारनेर
८०%



कु.अंकुश छबुराव पांढरे,
रा.गांजीभोयरे
७५%



कु.अजय छबुराव पांढरे,
रा.गांजीभोयरे
७५%



कु.सागर रोहिदास गागरे,
रा.वनकुटे
७४%



कुमारी केतकी दत्तात्रय
पठारे, रा.वाळवणे
७१%




कुमारी पुजा बाळासाहेब
शिंदे, रा.पिंपरी पठार
६५%

कुमारी शितल बाळासाहेब
पुजारी, रा.पुणेवाडी,
६५%



कुमार दीपक गोरक्ष
तिकोणे, रा.पाडळी दर्या
६४%



कुमार प्रतिक विठ्ठल
वाबळे, रा.घाणेगाव
६०%

## इ.१२वी कॉमर्स




कुमारी सोनाली गिताराम
थोपटे, रा.टाकळी ढोकेश्वर
६१%



कुमारी सुषमा मनोहर
बाचकर, रा.गांजीभोयरे
६०%

# कला-क्रीडा

❋ **कुमार सिद्धांत राजु लटांबळे** रा.पिंपळनेर हा इयत्ता ७वी मध्ये शिकत असून तो पुणे डिस्ट्रीक्ट ॲमॅक्युअर ॲक्वेटिक संस्थेतर्फे घेतलेल्या **पोहण्याच्या स्पर्धेमध्ये ५० मी. फ्रीस्टाईल** या प्रकारात जिल्ह्यामध्ये **दुसरा** आला. तसेच महाराष्ट्र स्टेट ॲमॅक्युअर ॲक्वेटिक संस्थेतर्फे रत्नागिरी येथे झालेल्या **सागर स्पर्धेमध्ये २ कि.मी. अंतरात राज्यात नववा** आला.



❋ श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथे आयोजित केलेल्या तालुका स्तरीय विज्ञान गणित प्रदर्शनात श्रीगोंदा येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता ४थी मध्ये शिकत असलेल्या **कु.सुजल सुहास औटी,** रा.पारनेर याने प्राथमिक विभागात **''रेन वॉटर हारवेस्टींग''** हे उपकरण सादर करुन प्रथम क्रमांक मिळविला. त्याच्या उपकरणाची जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली. याशिवाय त्यास कराटे स्पर्धेमध्ये यलो व ऑरेंज बेल्ट मिळाला आहे.



❋ **कु.चेतन रामदास सोबले** रा.जामगाव या इयत्ता १०वी तील विद्यार्थ्यास महाराष्ट्र राज्य सायकल पोलो असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या ज्युनियर सायकल पोलो स्पर्धेमध्ये **ब्राँझ पदक** मिळाले.



❋ **कुमारी स्नेहल सुनील पोटे,** रा.बाभुळवाडे, इ.६वी हिची **राष्ट्रीय बालविज्ञान परिषदे**च्या राष्ट्रीय स्तरावरील चेन्नई येथील प्रकल्प स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेमध्ये तिला **सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र** प्राप्त झाले.



❋ **कु.ईश्वरी अनंतराव मातेरे,** रा. बाभुळवाडे ही पिंपळे गुरव येथे एप्रिल २०१० मध्ये आयोजित केलेल्या **टेनीस टुर्नामेंटमध्ये** १० वर्षाखालील मुलींमध्ये **पहिली** आली. तसेच एप्रील २०११ मध्ये सनी ज्युनियर ओपन टेनीस टुर्नामेंट, पाषाण तर्फे आयोजित केलेल्या टेनीस टुर्नामेंटमध्ये १२ वर्षांखालील मुलींमध्ये दुसरी आली.



# पदवीधर

❋ **कु.विद्यानंद विठ्ठलराव कोठावळे** रा.सांगवी सुर्या याने अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमध्ये **सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौंटंट)** च्या अंतिम परीक्षेत यश मिळविले.





❋ **कुमारी सोनाली भास्कर घोडके** रा. पारनेर हीस **बी.ई. कॉम्प्युटर** मध्ये **७३%** गुण मिळाले.

❋ **कुमारी वृषाली राजाराम पागीरे** रा.पिंपरी पठार हीस **बी.ई. (ई. ॲण्ड टी.सी.)** मध्ये **७०%** गुण मिळाले.





❋ **कुमारी मोनिका विजय जाधव,** रा. पाडळी दर्या, हीस **बी.ए.बी.एड्.** मध्ये **६८%** गुण मिळाले.


❋ **डॉ. कु. प्रियंका विजय देशमुख** रा. पारनेर ही **बी.ए.एम.एस.** परीक्षा उत्तीर्ण झाली.





❋ **सौ. शिल्पा मयुर जगदाळे-बांगर,** माहेर बाभुळवाडे या **एम.फार्मसी** परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांना **६९%** गुण मिळाले आहेत.

❋ **कु. प्रतिक विजयकुमार ढुबे,** रा. कान्हुर पठार यास **बी.ई. (ई. ॲंड टी.सी.)** मध्ये **७१%** गुण मिळाले.



# प्रासंगिक

**कै.सौ.मंगला रामचंद्र भालेराव** रा.कान्हुर पठार या अतिशय शिस्तबद्ध, काटेकोर, करारी तितक्याच मायाळू विद्यार्थीप्रिय शिक्षीका होत्या. काही वर्ष त्यांनी ठाणे येथे डॉ.बेडेकर शिक्षण संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयात शिक्षिका म्हणून काम केले. त्यानंतर त्या पुण्यातील प्रसिद्ध आपटे प्रशाला संस्थेच्या शारदा विद्या मंदिर या संस्थेतून नोकरी करून सेवानिवृत्त झाल्या. मुळातच सेवाभावी वृत्ती असलेल्या मंगलाताईंनी अनेक विद्यार्थ्यांना स्वखर्चाने अनेक प्रकारची मदत केली. कोणतेही काम करण्यात त्यांचा सतत पुढाकार असल्यामुळेच त्यांच्या सहकाऱ्यांची त्यांच्याबद्दल आदराची भावना असे. सेवानिवृत्त झाल्यानंतरसुद्धा त्यांनी अनेक कामांमध्ये स्वतःला गुंतवून घेतले होते. वयाच्या ६२ व्या वर्षीच त्यांचे दि.०२.०५.११ रोजी निधन झाले. त्यांचे पती **श्री.रामचंद्र नागनाथ भालेराव** हे अतिरिक्त आयकर आयुक्त होते. त्यांनी आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

# ग्रामस्थ गौरव

❇ **श्री. विजय दिनकर काकडे** रा.कान्हूर पठार यांना दि.५ सप्टेंबर २०१० च्या शिक्षक दिनानिमित्त, अध्यापन क्षेत्रात लोकसेवेप्रित्यर्थ केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल मा.राष्ट्रपतींच्या हस्ते केंद्र सरकारतर्फे **'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार'** प्रदान करण्यात आला.





❇ **सौ.सिमा रामचंद्र झावरे-भरकड**, माहेर टाकळी ढोकेश्वर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे **अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क** म्हणून निवड झाली असून त्या ओबीसी मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

❇ **श्री. प्रकाश कृष्णराव टुबे** हे सध्या अतिरिक्त जिल्हाधिकारी, नाशिक येथे कार्यरत असून त्यांची **आय.ए.एस.** केडरमध्ये निवड झाली आहे. **बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी** म्हणून त्यांची शासनातर्फे नेमणूक झाली.





❇ **सौ. मधुरा संजय कदम**, रा. पिंपरी जलसेन, संचालिका, कदम डिजीटल ट्रान्सप्रिंटस् प्रा. लि. यांचा पुणे प्रेस ओनर्स असोसिएशनतर्फे प्रिटींग क्षेत्रातील २० वर्षांच्या भरीव कामगिरीबद्दल **''यशस्विनी''** पुरस्काराचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

❇ **इंजिनियर विजयकुमार गोविंदराव टुबे,** रा.कान्हूर पठार यांना परभणीच्या सामाजिक, विज्ञान व लोकसाहित्य संशोधन संस्था व महाराष्ट्र शासनातर्फे **'महाराष्ट्र निमार्ता'** या पुरस्काराने शिक्षणमंत्री ना.राजेश टोपे यांच्या हस्ते दि. २ मे, २०११ रोजी औरंगाबाद येथे गौरविण्यात आले. प्रशासकीय व सामाजिक कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०१० मध्ये त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' मा.राज्यपालांच्या हस्ते देण्यात आला होता.





❇ सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौंटंट) **श्री.संजय यशवंत खोसे** रा.पाडळी दर्या हे युनायटेड किंगडम मधील ग्लॅस्को शहरातील असोसिएशन ऑफ चार्टर्ड सर्टिफाईड अकौंटंट या संस्थेतून **''डिप्लोमा इन इंटरनॅशनल फायनल रिपोर्टींग स्टॅंडर्ड''** या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले.

❇ **श्री.गुलाबराव धोंडीबा रोकडे,** रा.वडगाव सावताळ यांना महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषदेतर्फे कामगार शिक्षक म्हणून **'कृतज्ञता गौरव'** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना यापूर्वी सुद्धा आदर्श कामगार शिक्षक व गुणवंत कामगार म्हणून गौरविण्यात आले होते.



# अभिनंदन

❇ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या पिरंगुट येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.बाळकृष्ण नारायण झावरे** रा.भोंद्रे यांची **पुणे विद्यापीठामध्ये वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष** म्हणून निवड झाली. तसेच ते विद्या परीषद व विज्ञान विद्या शाखेचे सदस्य आहेत.



❇ प्रसिद्ध समाजसेवक व पर्यावरणवादी **श्री.लालचंद उर्फ सुर्यकांत त्रिलोकचंद मुथीयान** रा.कान्हुर पठार यांची पिंपरी चिंचवड प्राधिकरण **जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी** बिनविरोध फेरनिवड झाली.

❇ **प्रा.माधव पंढरीनाथ गायके** रा.वासुंदे हे रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी पुणे १८ येथील ज्युनीयर कॉलेजमध्ये कार्यरत असून त्यांची पुणे जिल्हा **ज्युनियर कॉलेज संघटनेच्या** कार्यकारणीमध्ये **समन्वयक** म्हणून ३ वर्षांसाठी निवड झाली आहे.



❇ **सौ.देवता प्रकाश घोरपडे** रा.नवी सांगवी पुणे यांना महिला जनजागृती अभियान, व्यवसाय प्रशिक्षण, तंबाखू सेवन विरोधी चळवळ, एडस् जनजागरण, रक्तदान शिबीर, अशा अनेक सामाजिक राबविलेल्या कार्यक्रमासाठी जागतिक महिला दिनानिमित्त नेहरू युवा केंद्र पुणे व क्रीडा मंत्रालयातर्फे **'समाजभूषण'** पुरस्कार देऊन गौरविले.



❇ महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळातर्फे **श्री.ज्ञानेश्वर भागुजी कातोरे** यांना **गुणवंत कामगार पुरस्कार** देण्यात आला.



❇ **श्री. मुरलीधर तुकाराम साठे,** रा. पाडळी तर्फे रांजणगाव यांची **महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेवर** निवड झाली. तसेच त्यांची **पिंपरी चिंचवड विभागाच्या लायन्स क्लब झोनच्या प्रमुख पदी** निवड झाली.



**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# नांदा सौख्य भरे

- श्री.तुकाराम कोंडीबा जऱ्हाड रा.हिवरे कोरडा यांची सुकन्या **सौ.ताई** व श्री.बबन गिताराम झावरे रा.गारगुंडी यांचे सुपुत्र **चि.संदिप** यांचा शुभविवाह दिनांक **०७.०३.२०११** रोजी संपन्न झाला. श्री.जऱ्हाड व श्री.झावरे मंडळास प्रत्येकी **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे, रा.बाभुळवाडे यांची सुकन्या **सौ.शिल्पा** व श्री.मारुती किसनराव बांगर रा.पिंपळगाव (खडकी), ता.आंबेगाव, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.मयुर** यांचा शुभविवाह दिनांक **०५.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.बाजीराव जगदाळे यांनी **रू.१०००/-** व त्यांचे चुलते श्री.अच्युतराव जगदाळे सर यांनी मंडळास **रू.४०००/-** देणगी दिली.
- श्री.रघुनाथ गंगाराम सातपुते रा.चिंचोली यांचे सुपुत्र **चि.संदिप** व श्री.नितीन चंद्रकांत खराडे रा.अंधेरी, मुंबई यांची सुकन्या **सौ.पालवी** यांचा शुभविवाह दिनांक **०५.०५.२०११** रोजी संपन्न झाला.
- श्री.रामचंद्र लक्ष्मणराव ठुबे, रा.पारनेर यांची सुकन्या **सौ. वर्षा** व श्री.शंकर म्हातारबा टाकळकर, रा.टाकळकरवाडी, ता.खेड, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.गणेश** यांचा शुभविवाह दिनांक **१०.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.ठुबे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- प्राचार्य डॉ.भास्कर हरी झावरे, रा.भोंद्रे यांचे सुपुत्र **चि.पंकज** व प्रा.नानाभाऊ भगवान गांगर्डे रा.निमगाव गांगर्डा ता.कर्जत यांची सुकन्या **सौ.अश्विनी** यांचा शुभविवाह दिनांक **११.०५.२०११** रोजी संपन्न झाला. श्री.झावरे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.बाबाजी रामभाऊ दाते, रा.वासुंदे यांचे सुपुत्र **डॉ.नितीन** व श्री.प्रभाकर मारुती लांडगे रा.कळंबा ता.अकोले यांची सुकन्या **डॉ.सौ.जयश्री** यांचा शुभविवाह दिनांक **११.०५.२०११** रोजी संपन्न झाला.
- श्री.बबन तुळशीराम गायके, रा.वासुंदे यांचे सुपुत्र **चि.सचिन** व श्री.दिलीप नामदेव खटाटे, रा.काटाळवेढे यांची सुकन्या **सौ.राणी उर्फ स्वाती** यांचा शुभविवाह दिनांक **११.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.गायके यांनी मंडळास रू.१०००/- देणगी दिली.
- आयु.बाळासाहेब गंगाराम सोनवणे रा.निघोज यांचे सुपुत्र **चि. मंगेश** व आयु. देवराम नथु मेश्राम रा.वानवडी, पुणे यांची सुकन्या **सौ.दिप्ती** यांचा मंगल परिणय सोहळा दिनांक **१२.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त सोनवणे कुटुंबियांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.
- श्री.रामदास विठोबा शेलार रा.वनकुटे यांचे सुपुत्र **चि.भूषण** व श्री.रामदास लक्ष्मण वाघमारे रा.नारोडी ता.आंबेगाव जि.पुणे यांची सुकन्या **सौ. वैशाली** यांचा शुभविवाह दिनांक **१४.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.शेलार यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.
- श्री.भरत दत्तात्रय देशमुख, रा.दहिगाव, ता.सुधागड, जि.रायगड यांचे सुपुत्र **चि.प्रदिप** व श्री.कुंडलीक जगन्नाथ देशमुख रा.वणी, ता.खालापूर, जि.रायगड यांची सुकन्या **सौ.रुपाली** यांचा शुभविवाह दि.**१८.०५.२०११** रोजी संपन्न झाला.
- श्री.मुरलीधर कोंडाजी दुस्मान, रा.पुणेवाडी यांची सुकन्या **सौ.पल्लवी** व श्री.आनंदा राजाराम आगलावे रा.सारोळे सोमवंशी ता.श्रीगोंदा यांचे सुपुत्र **चि.मोहन** यांचा शुभविवाह **दिनांक २०.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.दुस्मान यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.
- श्री.भाऊसाहेब गंगाराम नरड रा.कासारे यांची सुकन्या **सौ. सुषमा** व श्री.पांडुरंग बाबुराव रासकर, रा.पिंपळनेर यांचे सुपुत्र **प्रा.सुरेश** यांचा शुभविवाह दिनांक **२२.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.नरड यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली. तसेच श्री.रासकर यांनी **रू.५०१/-** देणगी दिली.
- श्री. नारायण सदाशिव आहेर रा. पळसपुर यांची सुकन्या **सौ.रोहिणी** व श्री.बळवंत शंकर शिंदे रा.शिंदेवाडी ता.जुन्नर यांचे सुपुत्र **चि.दत्तात्रय** (बाबाजी) यांचा शुभविवाह **दिनांक २२.०५.२०११** रोजी संपन्न झाला.
- श्री.सुरेश किसनराव तानवडे, रा.वाडेगव्हाण यांचे सुपुत्र **चि. अमेय** व श्री.अशोक सुखदेव नवले, रा.राळेगण सिद्धी यांची सुकन्या **सौ.मंगल उर्फ मानसी** यांचा शुभविवाह दि. **२७.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.तानवडे यांनी मंडळास **रू.११००/-** देणगी दिली.
- श्री.सुहास अश्रुजी आग्रे रा.अळकुटी यांचे सुपुत्र **डॉ.अभिजीत** व श्री.मधुकर पंडीतराव पाटील रा.रोसे ता.परांडा जि.उस्मानाबाद यांची सुकन्या **ॲड.सौ.राधीका** यांचा शुभविवाह दिनांक **२८.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.आग्रे यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

# नांदा सौख्य भरे

❊ श्री.भास्करराव भिकाजी शेळके रा.भोंद्रे यांची सुकन्या **सौ. गोपी** व श्री. प्रवीण जगन्नाथराव वाडकर रा.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग यांचे सुपुत्र **चि.विनय** यांचा शुभविवाह दिनांक **२९.०५.२०११** रोजी संपन्न झाला. श्री.शेळके यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ श्री.कोंडीभाऊ राधुजी दातीर रा.कासारे यांची सुकन्या **सौ.अर्चना** व श्री.किसन रभाजी बारगळ रा.पळवे खुर्द यांचे सुपुत्र **चि.नवनाथ** यांचा शुभविवाह दिनांक **२९.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.दातीर यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ श्री.निवृत्ती आप्पाजी खणसे रा.गांजीभोयरे यांची सुकन्या **सौ.वैशाली** व श्री.भास्कर पिराजी पवार रा.वडगाव आमली यांचे सुपुत्र **चि.सुधीर** यांचा शुभविवाह दिनांक **२९.०५.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.खणसे यांनी मंडळास **रू.२१०१/-** देणगी दिली.

❊ श्री.श्रीपती गणपत गारगोटे रा.वाकी बु. ता.खेड जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.अमोल** व श्री.विठ्ठल मारुती लगड रा.दरकवाडी ता.खेड जि.पुणे यांची सुकन्या **सौ.नीलम** यांचा शुभविवाह दिनांक **०३.०६.२०११** रोजी संपन्न झाला.

❊ कै.सुदाम नामदेव पिसे रा.जातेगाव यांचे सुपुत्र **चि.दिपक** व श्री.दादासाहेब दिनकर डेरे रा.केंदूर ता.शिरुर जि.पुणे यांची सुकन्या **सौ.रुपाली** यांचा शुभविवाह दिनांक **११.०६.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.दिपक पिसे यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.

❊ श्री.दिपक भालचंद्र ठुबे रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.रेवती** व श्री.विश्वनाथ महादेव खाडे रा.पुणे यांचे सुपुत्र **चि. निखील** यांचा शुभविवाह दिनांक **१८.०६.२०११** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.बाळासाहेब म्हातारबा गार्डी रा.चिंचबाईगाव, ता.खेड यांचे सुपुत्र **चि.प्रकाश** व बाळासाहेब पिराजी गांडेकर रा.भोसे ता.खेड यांची सुकन्या **सौ.सविता** यांचा शुभविवाह **दि.१९.०६.२०११** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.विश्वनाथ तुळशीराम कळमकर, रा.कळमकरवाडी यांचे सुपुत्र **चि.संदिप** व श्री.विश्वनाथ रामचंद्र शितोळे (देशमुख) रा.पडवी, ता.दौंड, जि.पुणे यांची सुकन्या **सौ.वर्षा** यांचा शुभविवाह दिनांक **२०.०६.२०११** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.विश्वनाथ गोविंद साबळे रा.रायतळे यांचे सुपुत्र **चि.अमित** व श्री.रामभाऊ कोंडीबा लांडे रा.तळेगाव ढमढेरे ता.शिरुर यांची सुकन्या **सौ.राजश्री** यांचा शुभविवाह दिनांक **२५.०६.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.साबळे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ श्री.शिवाजीराव गबाजी पठारे रा.वाळवणे यांचे सुपुत्र **चि.संदिप** व श्री.नारायण परशुराम तांदळे रा.ता. नांदगाव जि.नाशिक यांची सुकन्या **सौ.योग्यता** यांचा शुभविवाह दिनांक **२६.०६.२०११** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.रामदास सोनाजी शिर्के रा.कजुर्ले हरेश्वर यांचे सुपुत्र **चि.प्रभात** व श्री.भाऊसाहेब पांडुरंग गागरे रा.वनकुटे यांची सुकन्या **सौ.स्नेहल** यांचा शुभविवाह **दि.२६.०६.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.शिर्के यांनी मंडळास **रू.२०००/-** तसेच श्री.गागरे यांनी **रू.१००१/-** देणगी दिली.

# आपण असे केले तर




❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व.मनोज** यांच्या दिनांक १०.०८.२०११ च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



❊ **प्रा.सुरेश बाजीराव पठारे** रा.वाळवणे यांनी त्यांचे सुपुत्र **चि.आदित्य** याच्या दि.२१.०५.२०११ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै.सौ. अलका (निलम) बाबाजी तोडकर** रा. वडझिरे यांच्या दिनांक १८.७.२०११ च्या स्मृती दिनानिमित्त बंधु श्री.अशोक विश्वनाथ वाबळे रा.निघोज यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.कचरदास धनराज कटारिया** रा. राळेगण थेरपाळ यांनी त्यांच्या दिनांक १५.०६.२०११ रोजीच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.११००/-** देणगी दिली.

**'संवाद' पत्रिकेबाबत**
**आपल्या प्रतिक्रिया जरुर कळवाव्यात.**

# भावपूर्ण निरोप



❊ **श्री.गोवींद दामोदर ढोरमले,** रा.जातेगाव हे ॲटलास कोपको या कंपनीतून दिनांक **०१.०४.२०११** रोजी ४० वर्षांच्या नोकरीनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

❊ **प्रा.ज्ञानदेव हरिभाऊ एरंडे** रा. वडझीरे हे पुणे जिल्हा शिक्षणं मंडळाच्या शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय नसरापूर ता.भोर येथून ३५ वर्षांच्या सेवेनंतर दिनांक **३१.०५.२०११** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त प्रा. एरंडे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **सौ.बबई कुंडलीक पोटे,** रा.बाभुळवाडे या श्री. रंगनाथ स्वामी प्राथमिक विद्यालय भोसरी या संस्थेतून प्रदीर्घ सेवेनंतर मुख्याध्यापीका या पदावरून दिनांक **३१.०५.२०११** रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.





# निधन वार्ता



❊ **शिवाजी पाटीलबुवा कदम** (वय ६२) रा.पिंपरी जलसेन यांचे निधन **दि.१७.०९.२०१०** रोजी झाले.

❊ **श्रीमती शांताबाई गेनबा शेळके** (वय ८५) रा.वाडेगव्हाण यांचे निधन **दि. ०४.०२.२०११** रोजी झाले.






❊ **रघुनाथ उर्फ शांताराम विश्वनाथ शेरकर** (वय ६७) रा.पारनेर यांचे निधन **दि.०७.०४.२०११** रोजी झाले.

❊ **नारायण बाळाजी पिसे** (वय ७५) रा.गटेवाडी यांचे निधन दिनांक **०९.०४.२०११** रोजी झाले.

# निधन वार्ता



❊ **रामभाऊ कोंडाजी हांडे** (वय ८२) रा. पारनेर यांचे निधन **दि. १८.०४.२०११** रोजी झाले.

❊ **जगन्नाथ रंगनाथ शिंदे गुरूजी** (वय ८५) रा.बाबुर्डी यांचे निधन **दि.२८.०४.२०११** रोजी झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आचारविचारांची छाप त्यांच्या जीवनावर होती.

❊ **राजाराम मारुती खणकर गुरूजी** (वय ७५) रा. बाभुळवाडे यांचे निधन **दि.३०.०४.२०११** रोजी झाले.





❊ **सौ.मंगला रामचंद्र भालेराव** (वय ६२) रा.कान्हुर पठार यांचे निधन **दि.०२.०५.२०११** रोजी झाले.

❊ **नायब सुभेदार लक्ष्मण सावळेराम पठारे** (वय ५४), रा.राळेगण सिद्धी यांचे निधन **दि.०७.०५.२०११** रोजी झाले.





❊ **श्रीमती बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** (वय ८२) रा.सुपे यांचे निधन **दि.११.०५.२०११** रोजी झाले. त्यांनी जैन धर्मातील पवित्र परंपरेनुसार संथारा व्रत घेतले होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे चिरंजीव श्री.अशोक यांनी मंडळास रू.५००/- देणगी दिली.

❊ **सौ. कासाबाई सावळेराम पठारे** (वय ७४), रा.राळेगण सिद्धी यांचे निधन **दि.२९.०५.२०११** रोजी झाले.



❊ **श्रीमती रतनबाई चंदनमल भळगट** (वय ९५) रा.कान्हूर पठार यांचे निधन दि.१०.०६.२०११ रोजी झाले.

❊ **बापु पांडुरंग जऱ्हाड** (वय ५५) रा.जातेगाव यांचे आकस्मिक निधन **दि.२०.०६.२०११** रोजी झाले.



# मा.अण्णांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला मंडळाचा पाठींबा!



जंतरमंतर (नवी दिल्ली) येथे मा.अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी चालू केलेल्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी मंडळाच्या वतीने मी (मुरलीधर चौधरी) दिनांक ०७.०५.२०११ रोजी नवी दिल्लीस रवाना झालो. दिल्लीत आधीच हजर असलेले **श्री.भगवान पठारे** यांनी निवासाबाबतचे सहकार्य केले. उपोषणस्थळी वातावरण प्रचंड उत्साही व मंतरलेले होते. **रस्त्यावर पेटविलेल्या मेणबत्त्या, कापडी फलक, पोस्टर्स, तिरंगी झेंडे, कार्टुन्स, तरुणांच्या डोक्यावर अण्णांचे फोटो आणि नावाच्या टोप्या, नावाचे कपडे** व वेगवेगळ्या वाद्यांचा गजर तसेच गजराच्या तालात बेफाम होऊन तरुण-तरुणी देशभक्तीपर गीते गात होती. स्टेजच्या दोन्ही बाजुला उपोषणकर्ते स्थानापन्न झालेले होते. स्टेजसमोर मिडीयावाल्यांचे कॅमेरे सज्ज होते. रक्षणासाठी कुठेही पोलीस नव्हते. सर्व स्वयंसेवकच जबाबदारी पार पाडत होते. स्टेजवर जाऊन निवेदन द्यावे म्हटले तर खूपच गर्दी होती. जवळच दोन टोपीवाले दिसले तर ते गाववालेच निघाले. बरे वाटले गप्पा मारायला. रात्री उशीरा पोहोचल्यामुळे जेवणाची सुविधा बंद झाली होती. पण त्या वातावरणात भूकच विसरून गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व आटोपून उपोषण कर्त्यांमध्ये सामील झालो. सरकारबरोबर चर्चा चालू होती परंतू लेखी स्वरूपात काहीच हातात पडले नव्हते. लोकांच्या झुंडीच्या झुंडी मोर्चाने हातात **भ्रष्टाचार विरोधी फलक** घेऊन येत होत्या.


**आपल्या भूमीतील एक फकीर, वैराग्य मूर्ती, कर्मयोगी पद्मभूषण मा.अण्णासाहेब हजारे दिल्लीत भ्रष्टाचार विरोधी कायद्यासाठी चंदनाप्रमाणे देह झिजवीत होते.** त्यांना देशपरदेशातील सर्व थरातून उस्फूर्त पाठींबा मिळत होता. अद्याप उपोषण सोडलेले नव्हते. मसुद्याची वाट पहात समोर तुडुंब गर्दी वाढतच होती. **श्री.अनिल शर्मा, सुरेश पठारे, साहेबराव मोरे, दशरथ बोरूडे, डॉ.प्रवीण शर्मा, डॉ.गंधे,** अशी मोजकीच मराठीत बोलणारी मंडळी होती. बाजुला चरख्यावर सुत कातणारी गांधीवादी मंडळी बसली होती.

सकाळचे १०.२५ झाले. शासनाकडून लेखी स्वरुपात मसुदा आला. त्याबरोबर सकाळी १० वाजून ३१ मिनीटांनी अण्णांनी लहान मुलीच्या हातून रसाचा ग्लास घेऊन उपोषणाची समाप्ती केली. सर्वत्र अण्णाचा जयजयकार चालूच होता. **एका आंदोलनाची यशस्वी सांगता झाली.** पुढची लढाई तर चालूच आहे.

आता परतीचे वेध लागले होते. मंडप सोडून रेल्वे स्टेशन गाठले व रात्री ११.३० वा. परतीचा प्रवास सुरु झाला. ३१ तासानंतर पुण्यात पोहोचलो. पारनेर तालुका मित्र मंडळाने ही अनमोल संधी दिली याबद्दल मी मंडळाचा आभारी आहे.

- **मुरलीधर चौधरी** (हिवरे कोरडा)

# कर्तृत्व पारनेरकरांचे - श्री.राजेंद्र कचरदास घावटे



श्री.राजेंद्र घावटे मुळचे जवळे गावचे राहणारे, कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना सुरुवातीपासून शिक्षणावर अव्वल स्थानावर असत. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. इ.४च्या शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात पहिले आले आणि त्यानंतर सतत वेगवेगळ्या परीक्षेमध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केले. वडील भूमीहीन असल्यामुळे अनेकदा मजुरी करतच शिक्षण पूर्ण केले. पूर्व माध्यमिक, माध्यमिक व राष्ट्रीय पातळीवरील शिष्यवृत्ती मिळवतच त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. केवळ पायजमा, सदरा आणि ७५ रु.खिश्यात ठेऊन अनवाणी पुण्यात उच्च शिक्षणासाठी आले.

विशेष प्राविण्यासह अभियांत्रिकी पदविका पदवी तसेच पुणे विद्यापीठाची व्यवस्थापन शास्त्रातील पदव्युत्तर पदविकाही त्यांनी प्राप्त केली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ प्रॉडक्शन इंजिनियर्स या संस्थेची फेलोशिपही त्यांना मिळाली.

प्रतिकूल परीस्थितीचा सामना कसा करावा याची प्रेरणा त्यांनी आईकडून घेतली तर सामाजिक कार्याची प्रेरणा वडिलांकडून मिळाली आहे. राष्ट्रसेवादलाच्या कला पथकात राजेंद्र घावटे यांचे वडील काम करीत असत. ग्रामीण लोककला, नाटक, भजन, शाहिर परिषद यातही ते सहभागी होते. ते नामवंत भजन गायक होते.

त्यांचाच आदर्श राजेंद्र यांनी घेऊन स्वावलंबी होण्याचे ध्येय बाळगत व सतत स्वतःमध्ये सुधारणा करीत आपल्या नोकरीत प्रगती केली. प्रिमीयर ऑटो., बजाज ऑटो, बजाज टेम्पो, पथेजा फोर्जींग आदि नामवंत कंपनीत त्यांनी काम केले. सध्या ते स्पॅको कार्बोरेटर्स या कंपनीमध्ये वरिष्ठ व्यवस्थापक व व्यवस्थापन प्रतिनिधी या पदावर कार्यरत आहेत.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाज परिवर्तनाचा प्रयत्न करण्यासाठी पिंपरी चिंचवड परिसरात ते विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित आहेत. चिंचवड येथील सावरकर प्रतिष्ठानचे ते सचीव आहेत. सिद्धी विनायक व्याख्यानमाला, नवयुग साहित्यमंडळ, अभिनव सोशल फाउंडेशन इ.संस्थांमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मदत करण्यात ते पुढाकार घेतात.

विविध विषयांवर शाळा, महाविद्यालय, मंडळे अशा ठिकाणी मार्गदर्शनपर व्याख्याने देतात. ते उत्कृष्ट निवेदक व सूत्र संचालक आहेत. निळू फुले, सुधीर गाडगीळ, लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या प्रगट मुलाखती देखील त्यांनी घेतलेल्या आहेत. ज्ञान प्रबोधिनीच्या समन्वय मासिकातून ते नियमित लेखन करतात. लोकमत फिर्याद, कर्तव्यदक्ष योद्धा आदि दिवाळी अंकातून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या पत्नी सौ.जयश्रीताई या माध्यमिक शिक्षिका असून त्यांचेही सामाजिक कार्यास सतत सहकार्य असते.

पिंपरी चिंचवड मनपाचा कार्यगौरव पुरस्कार, राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक विशेष कार्यगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. संत तुकाराम महाराजांचे विचार आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा.पद्मभूषण अण्णासाहेब हजारे हे त्यांचे आदर्श होत.

- **सुनील पोटे**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१० ते ३१.०३.२०११ अखेरचे

| जमा | रुपये |
|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | |
| रोख | ३,५७२.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | १७,९९६.८२ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २८,४११.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ५०६.०० |
| बचत ठेव व्याज खाते | २०,४७२.०० |
| मुदत ठेव व्याज खाते | ५८,३८४.०० |
| बिल्डिंग फंड खाते | १३,२२,१०८.०० |
| मुदत ठेव | २,४३,९९९.०० |
| फॉर्म फी | १,१७५.०० |
| होस्टेल फी | १,०७,०००.०० |
| होस्टेल डिपॉझीट | २२,०००.०० |
| टि.डी.एस. | ३१,८९१.०० |
| **एकूण रुपये** | **१८,५७,५१४.८२** |

| खर्च | रुपये |
|---|---|
| बँक चार्जेस खाते | १,२५०.२६ |
| वार्षिक मिटिंग व समारंभ खर्च | ३३,१३८.०० |
| दुरुस्ती खर्च | ३००.०० |
| शैक्षणिक मदत | ४,०००.०० |
| वैद्यकीय मदत | ५,०००.०० |
| साफसफाई खर्च | ३,४३०.०० |
| वॉचमन पगार | ३०,८००.०० |
| पोस्टेज खर्च | ८००.०० |
| प्रवास खर्च खाते | ६,८९०.०० |
| लिहिणावळ | ५,५००.०० |
| ऑडिट फी | ३,५००.०० |
| झेरॉक्स आणि टायपिंग | १,१२८.०० |
| लाईट बील | ३२,०५०.०० |
| जाहिरात | ७६०.०० |
| सभा खर्च | ७९०.०० |
| किरकोळ खर्च | २,२४२.०० |
| प्रॉपर्टी टॅक्स | ५०,४६०.०० |
| पाणीपट्टी | १,५४४.०० |
| मानधन | २८,०००.०० |
| लिगल फी | ८५०.०० |
| रिफ्रेशमेंट | ८५५.०० |
| प्रथमोपचार खर्च | ५१५.०० |
| पाईपलाईन फिटींग खर्च | १,८१०.०० |
| होस्टेल डिपॉझीट | १२,०००.०० |
| सिक्युरिटी डिपॉझीट | १,००,०००.०० |
| इमारत बांधकाम | ८२,३६१.०० |
| फर्निचर व फिक्चर्स | ६,१८,८०६.०० |
| इलेक्ट्रिक फिटींग | ४८,९५५.५० |
| कन्स्ट्रक्शन कन्सल्टन्सी चार्जेस | २,४०,०००.०० |
| **प्रिंटींग खर्च** | |
| प्रिंटींग आणि स्टेशनरी | २५,७३५.०० |
| त्रैमासिक छपाई खर्च | ११,३२६.०० |
| **अखेरची शिल्लक** | |
| रोख | ६८७.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | २,२८,८९५.०६ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १,९३,६३९.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र - ५२५१२ | ७९,४९८.०० |
| **एकूण रुपये** | **१८,५७,५१४.८२** |

| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१० ते ३१.३.२०११ अखेरचे

| खर्च | रुपये | जमा | रुपये |
|---|---|---|---|
| बँक चार्जेस खाते | १,२५०.२६ | | |
| वार्षिक मिटिंग व समारंभ खर्च | ३३,१३८.०० | बचत ठेव व्याज खाते | २०,४७२.०० |
| दुरुस्ती खर्च | ३००.०० | | |
| शैक्षणिक मदत | ४,०००.०० | मुदत ठेव व्याज खाते | ५८,३८४.०० |
| वैद्यकीय मदत | ५,०००.०० | फॉर्म फी | १,१७५.०० |
| साफसफाई खर्च | ३,४३०.०० | | |
| वॉचमन पगार | ३०,८००.०० | होस्टेल फी | १,०७,०००.०० |
| पोस्टेज खर्च | ८००.०० | | |
| प्रवास खर्च खाते | ६,८९०.०० | | |
| लिहिणावळ | ५,५००.०० | | |
| ऑडिट फी | ३,५००.०० | | |
| झेरॉक्स आणि टायपिंग | १,१२८.०० | | |
| लाईट बील | ३२,०५०.०० | | |
| जाहिरात | ७६०.०० | | |
| सभा खर्च | ७९०.०० | | |
| किरकोळ खर्च | २,२४२.०० | | |
| प्रॉपर्टी टॅक्स | ५०,४६०.०० | | |
| पाणीपट्टी | १,५४४.०० | | |
| मानधन | २८,०००.०० | | |
| प्रिंटींग आणि स्टेशनरी | २५,७३५.०० | | |
| त्रैमासिक छपाई खर्च | ११,३२६.०० | | |
| लिगल फी | ८५०.०० | तोटा ताळेबंदास वर्ग | ९६,५८२.२६ |
| रिफ्रेशमेंट | ८५५.०० | | |
| प्रथमोपचार खर्च | ५१५.०० | | |
| पाईपलाईन फिटींग खर्च | १,८१०.०० | | |
| घसारा | ३०,९४०.०० | | |
| **एकूण रुपये** | **२,८३,६१३.२६** | **एकूण रुपये** | **२,८३,६१३.२६** |

| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०११ अखेरचे

| जमा | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **इतर निधी** | | |
| **बिल्डींग फंड** | | ८१,३८,७८८.०३ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ६८,१६,६८०.०० | |
| अधिक जमा | १३,२२,१०८.०० | |
| **शैक्षणिक फंड** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० |
| **अंत्यविधी जमा निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **टेंडर डिपॉझिट** | | ४,६५९.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,०४,६५९.०० | |
| वजा - चालू वर्षी | १,००,०००.०० | |
| **सिक्युरिटी डिपॉझीट** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३१,३९२.०० |
| होस्टेल डिपॉझीट | | १०,०००.०० |
| **एकूण रुपये** | | **८४,८४,९८०.०३** |


| खर्च | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता -** | | |
| **जमीन खरेदी** -मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इमारत बांधकाम -** | | ६०,६३,५०५.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ५९,८१,१४४.०० | |
| अधिक - चालू वर्षी | ८२,३६१.०० | |
| **कन्स्ट्रक्शन कन्सल्टन्सी चार्जेस -** चालू वर्षी | | २,४०,०००.०० |
| **बोअरवेल -** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०५०.०० |
| **मोटारपंप -** मागील ताळेबंदाप्रमाणे | | २४,१६५.०० |
| **फर्नि.व फिक्चर -** चालू वर्षी | ६,१८,८०६.०० | ५,८७,८६६.०० |
| वजा - घसारा | ३०,९४०.०० | |
| **इलेक्ट्रिक फिटींग** | | ४८,९५५.५० |
| **वृक्ष संवर्धन ठेव** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| **एम.एस.ई.बी.डिपॉझिट** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **टि.डी.एस.-** | | १६,८४८.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ४८,७३९.०० | |
| अधिक - चालू वर्षी | ३१,८९१.०० | |
| **उत्पन्न खर्च खाते** | | १,२६,५६०.४७ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २९,९७८.२१ | |
| अधिक - तोटा | ९६,५८२.२६ | |
| **अखेरची शिल्लक -** | | ५,०२,७१९.०६ |
| रोख | ६८७.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक | २,२८,८९५.०६ | |
| स्टेट बँक | १,९३,६३९.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ७९,४९८.०० | |
| **एकूण रुपये** | | **८४,८४,९८०.०३** |

**बाजीराव जगदाळे**
सेक्रेटरी

**सखाराम गागरे**
उपाध्यक्ष

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**मे.के.बी.साळुंके अँड कं.**
लेखा परीक्षक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु झाले आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (tsunil9657@gmail.com) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०